
# उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण

## (समाजशास्त्रीय भूमिका)



डॉ. सौ. संध्या उध्दव सामुद्रे

Gift 004

यु.जी.सी.च्या अभ्यासक्रमानुसार महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या
बी.एड्., एम.एड्. व एम.ए. (शिक्षणशास्त्र) अभ्यासक्रमानुसार
एकमेव क्रमिक पाठ्यपुस्तक तसेच सेट, एम.फिल., पीएच.डी.
करिता उपयुक्त संदर्भग्रंथ

# उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण
## (समाजशास्त्रीय भूमिका)

# Education in Emerging Indian Society
## (Sociological Role)

GOVT. COLLEGE OF EDUCATION
AKOLA- 444 001.
LIBRARY
Acc'n. No. Gift 004
Class No.
Date 9/9/14 Price 350/-

: लेखिका :
डॉ. सौ. संध्या उद्धव सामुद्रे
एम.एससी., एम.ए., एम.एड., पीएचडी (शिक्षणशास्त्र)
अकोला

Speciman Copy
Mangesh Prakashan, Nagpur

श्री मंगेश प्रकाशन
श्री शांतादुर्गा निवास, तरुणभारतजवळ, २३, नवी रामदासपेठ, नागपूर–१०

प्रकाशक :
**श्री मंगेश प्रकाशन**
२३ नवी रामदासपेठ, सोमलवार शाळेजवळ, नागपूर–४४० ०१०
फोन नं. : ०७१२-२४३७२७६ मो. : ०९८२३८०७२७६

ISBN No. : 978-93-83164-11-0

प्रथमावृत्ती
संकष्ट चतुर्थी, २६ जून २०१३

सर्वहक्क
श्री उद्धव शा. सामुद्रे

किंमत - रुपये ३५०/- फक्त

अक्षर जुळणी व मुखपृष्ठ : **सागर बा. लोडम**, मुक्ता ग्राफिक्स, अकोला

मुद्रक : **समर्थ प्रिंटर्स, नागपूर**

# मनोगत

उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण (समाजशास्त्रीय भूमिका) हे पुस्तक विद्यार्थी देवतेला आणि आपणा सर्वांना समर्पित करतांना मला अतिशय आनंद होत आहे. गेली अनेक वर्षे शिक्षण क्षेत्रात अध्यापन करीत असतांना प्रस्तुत पुस्तक निर्मितीची प्रेरणा खरे तर आमच्या विद्यार्थी देवतेनेच दिली.

हा विषय शिकवित असतांना तत्त्वज्ञानाशी संबंधित अनेक पुस्तके आहेत असे विद्यार्थ्यांकडून सूचित झाले परंतु समाजशास्त्राशी संबंधित विस्तृत विवेचन असणारे पुस्तक उपलब्ध नाही, ते असणे आवश्यक आहे अशी सूचना विद्यार्थ्यांनी वारंवार केली. ज्यांच्यासाठी अध्यापन करीत आहे अशा विद्यार्थ्यांची ही मुख्य समस्या दूर करावी हा हेतू समोर ठेवून प्रस्तुत पुस्तक साकारले गेले. अध्ययन - अध्यापनाला उपयुक्त व मजबूत करण्यास पुस्तक निश्चित उपयोगी पडेल असा मला विश्वास वाटतो. प्रस्तुत पुस्तक बी.एड्., एम.एड्. व सेट परीक्षेच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरेल असे वाटते.

एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ, नांदेड विद्यापीठ, अमरावती विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठ, पुणे विद्यापीठ अशा महाराष्ट्रातील विभिन्न विद्यापीठाच्या बी.एड्. व एम.एड्. अभ्यासक्रमानुसार प्रस्तुत पुस्तकात विषय संबोधिला आहे. त्यामुळे सर्वच विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक व या विषयाशी संबंधित सर्वांना या पुस्तकाचा निश्चितपणे लाभ होईल अशी आशा आहे.

वर निर्देशित सर्व विद्यापीठांच्या बी.एड्. व एम.एड्. च्या अद्ययावत अभ्यासक्रमाचे पृथःकरण करून पुस्तक लिहिलेले आहे. विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना विषयाची सम्यक् कल्पना यावी, त्यांना आवश्यक ती उपयुक्त माहिती मिळावी, त्यांच्या विचारांना चालना मिळावी, त्यांच्या संकल्पना स्पष्ट व्हाव्यात हे उद्देश या पुस्तकाचे आहे.

बी.एड्. व एम.एड्. अभ्यासक्रमातील या विषयाचे स्वरूप व दृष्टिकोन दिवसेंदिवस खूपच बदलत आहे. भारतातील उदयोन्मुख समाज डोळ्यासमोर ठेवून

शिक्षणविषयक विचार या पुस्तकात अगदी सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही वर्षापूर्वीचा समाज आणि आजचा समाज यात खूप परिवर्तने झालेली आपल्याला दिसून येतात. ज्ञान आणि अनुभवाच्या प्रकाशात भारतीय समाज सुधारणेचा वेध घेत आहे आणि गतीशील होत आहे. सूर्यफूल ज्याप्रमाणे सूर्याच्या दिशेने प्रकाशाकडे वळते तसा भारतीय समाज ज्ञानाच्या दिशेने वळण्याचा सतत प्रयत्न करीत आहे. अशी परिवर्तने घडून येत असलेल्या समाजाला कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते व त्या समस्यांतून मार्ग काढीत कशी वाटचाल करावी लागते, भविष्यात असणारी व येणारी आव्हाने पेलण्याचे आवाहन कसे स्विकारावे याचे विवेचन या पुस्तकाचा विषय आहे.

विशेष म्हणजे विभिन्न विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणशास्त्राच्या अभ्यासक्रमाचा येथे सांगोपांग विचार करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणशास्त्राच्या पहिल्या प्रश्नपत्रिकेच्या दृष्टिने हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल असे वाटते. विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षणप्रेमी ह्या सर्वांना हे पुस्तक आवडेल अशी अपेक्षा आहे.

हे पुस्तक अभ्यासतांना आजचा शिक्षक बदलत्या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात अधिक विचार करू लागला व नवे मार्ग शोधून वाटचाल करू लागला तर भारतीय समाज विकसनशीलतेकडून विकसित अवस्थेकडे अधिक लवकर पोहचू शकेल. शिक्षक हा सामाजिक बदलाचा अग्रदूत असतो! म्हणून विद्यार्थी-शिक्षकांना या पुस्तकाद्वारे एक निश्चित दिशा मिळेल असा मला विश्वास वाटतो. पुस्तकाचे शेवटी प्रश्नपेढी व विद्यापीठीय प्रश्नपत्रिका दिलेल्या आहेत. ह्याचा निश्चितच विद्यार्थ्यांना लाभ होईल.

प्रस्तुत पुस्तकाच्या निर्मितीत मला थोरांचे मार्गदर्शन मिळाले. अनेकांचे सहकार्य व प्रेरणा मिळाली. त्या सर्वांच्या प्रति मी ऋण व्यक्त करते. पुस्तक साध्य करण्यासाठी ज्यांनी मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या साहाय्य केले त्या सर्वांचे आभार. ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाची सर्वतोपरी जबाबदारी श्री मंगेश प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर यांनी स्विकारली व पुस्तक प्रकाशित केले त्यांची मी ऋणी आहे. तद्वतच माझे कुटुंबीय सदस्य, सहकारी, मित्र-मैत्रिणी, मार्गदर्शक या सर्वांच्या प्रति ऋण निर्देश करणे हे माझे कर्तव्य आहे.

पुस्तकातील जेजे आपणास उपयुक्त व मार्गदर्शक ठरेल ते आपणच मला दिले आहे असे मी मानते. पुस्तकातील उणिवा, त्रूटी, कमतरता, अपुरेपणा, चुका यांना मीच जबाबदार आहे अशी प्रांजळ कबुली मी देत आहे.

या पुस्तकाचे सर्वत्र स्वागत होईल अशी खात्री आहे. आपणा सर्वांचे सहकार्य, आशिर्वाद व प्रेरणा देऊन प्रोत्साहित केल्यास लेखनप्रवास अधिक समृध्द होईल अशी मनोमन इच्छा व्यक्त करते.

धन्यवाद!

**- डॉ.सौ.संध्या उध्दव सामुद्रे**

अकोला

# अनुक्रमणिका

प्रकरण

**१. शिक्षण - संकल्पना .............................. ०१-०७**

१.१ प्रास्ताविक, १.२ व्याख्या, १.३ शिक्षणाचा संकुचित व व्यापक अर्थ, १.४ शिक्षणाचे उद्देश, प्रयोजन व कार्ये, १.४.१ वैयक्तिक दृष्टिने शिक्षणाचे उद्देश, प्रयोजन वा कार्ये, १.४.२ शिक्षणाचे सामाजिक उद्देश, प्रयोजन वा कार्ये, १.५ उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षणाची व्याप्ती

**२. समाजशास्त्राची संकल्पना .............................. ०८-१८**

२.१ प्रास्ताविक, २.२ समाज - स्वरूप, २.३ समाजाच्या व्याख्या, २.४ समाजाची लक्षणे, २.५ समाजशास्त्र म्हणजे काय? (स्वरूप), २.६ समाजशास्त्राच्या व्याख्या, २.७ समाजशास्त्राची लक्षणे, २.८ समाजशास्त्राची व्याप्ती, २.९ शिक्षण व समाजशास्त्र

**३. समाजशास्त्र आणि शिक्षण .............................. १९-४५**

३.१ प्रास्ताविक, ३.२. समाजशास्त्राचे स्वरूप, ३.३ व्याख्या, ३.४ शैक्षणिक समाजशास्त्राची ध्येये, ३.५ शैक्षणिक समाजशास्त्राची उद्दिष्टे, ३.६ शैक्षणिक समाजशास्त्राची शिक्षकाला आवश्यकता, ३.७ समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शिक्षणाची कार्ये, ३.८ शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती, ३.९ शैक्षणिक समाजशास्त्र व शिक्षण परस्परसंबंध, ३.१० शिक्षणाचे समाजशास्त्र, ३.११ शिक्षणाच्या समाजशास्त्राची वैशिष्ट्ये, ३.१२ शिक्षणाचा समाजशास्त्रावर अभ्यासविषय, ३.१३ शैक्षणिक समाजशास्त्र व शिक्षणाचे समाजशास्त्र यातील फरक

**४. लोकशाही व शिक्षण .............................. ४६-७५**

४.१ प्रास्ताविक, ४.२ लोकशाहीचा अर्थ, ४.३ लोकशाहीच्या व्याख्या,
४.४ लोकशाहीची लक्षण, ४.५ लोकशाहीची वैशिष्ट्ये, ४.६ लोकशाहीची यशस्विता,
४.७ लोकशाहीत पाळावयाची पथ्ये, ४.८ लोकशाहीसाठी शिक्षणाची आवश्यकता,

४.९ लोकशाही शिक्षणाची वैशिष्ट्ये, ४.१० लोकशाही आणि शिक्षण, ४.१०.१ लोकशाही व शिक्षण परस्पर संबंध, ४.१०.२ लोकशाही व शिक्षणाची ध्येये, ४.१०.३ लोकशाही व शिक्षणाचा अभ्यासक्रम, ४.१०.४ लोकशाही व शिक्षण पद्धती, ४.१०.५ लोकशाही व शासन, ४.१०.६ लोकशाही व शिक्षक, ४.१०.७ लोकशाही व विद्यार्थी, ४.१०.८ लोकशाही व शाळा, ४.१०.९ लोकशाही व शिक्षण - अन्य बाबी, ४.११ लोकशाही प्रवृत्तीच्या नागरिकत्वाचे शिक्षण, ४.१२ लोकशाही नागरिकत्वाच्या शिक्षणाचे उद्दिष्ट, ४.१३ लोकशाही प्रवृत्तीच्या नागरिकत्वाचे शिक्षण देण्याची आवश्यकता, ४.१४ विविध उपक्रम, ४.१५ लोकशाही व शिक्षण

**५. भारतीय संविधान व शिक्षण ................................ ७६-१०६**

५.१ प्रास्ताविक, ५.२. भारतीय संविधानाचे महत्त्व, ५.३ भारतीय संविधनातील मार्गदर्शक तत्त्वे, ५.४., संविधानातील शिक्षणविषयक तरतूदी, ५.५ भारतीय संविधानातील शिक्षणविषयक कलमे, ५.६ शिक्षणाचा हक्क , ५.७ भारतीय संविधानानुसार शैक्षणिक ध्येये, ५.७.१ डॉ. राधाकृष्णन् आयोग किंवा विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-४९), ५.७.२ माध्यमिक शिक्षण आयोग - मुदलियार आयोग (१९५२-५३), ५.७.३ भारतीय शिक्षण आयोग (१९६४-६६), ५.७.४ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६)

**६. धर्मनिरपेक्षता व शिक्षण............................ १०७-११८**

६.१ प्रास्ताविक, ६.२ धर्मनिरपेक्षतेचा अर्थ व व्याख्या, ६.३ धर्मनिरपेक्षतेची विविध अंगे, ६.४ धर्मनिरपेक्षता या तत्त्वामधील बाबी, ६.५.धर्मनिरपेक्षतेचा सामाजिक आशय, ६.६ धर्मनिरपेक्षता व शिक्षणाचे स्थान , ६.७. धर्मनिरपेक्षता व शिक्षणाची भूमिका, ६.८ धर्मनिरपेक्षतेत शिक्षकाची भूमिका, ६.९ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, (१९८६)

**७. समाजवाद आणि शिक्षण ............................ ११९-१४२**

७.१ प्रास्ताविक, ७.२ समाजवादी सिद्धांत, ७.३ समाजवादाची वैशिष्ट्ये, ७.४ समाजवाद व शिक्षण, ७.५ समाजवादी समाजरचना, ७.६ समाजवादी

समाजरचनेची उद्दिष्टे, ७.७ समाजवादी समाजरचना निर्मितीसाठी बाबी, ७.८ समाजवादी समाजरचनेची वैशिष्ट्ये, ७.९ भारतीय संविधान व समाजवादी समाजरचना, ७.१० लोकशाही व समाजरचना, ७.११ समाजवादी समाजरचना व शिक्षण, ७.१२ विविध आयोग व शिक्षणाची ध्येये, ७.१३ समाजवादी समाजरचनेची यशस्वीता

**८. राष्ट्रीय एकात्मता व शिक्षण.............................. १४३-२०६**

८.१ प्रास्ताविक, ८.२ राष्ट्र म्हणजे काय?, ८.३ राष्ट्रीयत्व म्हणजे काय?, ८.३.१ उदार राष्ट्रीयत्वाचे गुण, ८.४ राष्ट्रीय एकात्मता, ८.४.१ राष्ट्रीय एकात्मता - अर्थ व व्याख्या, ८.४.२ राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक बाबी, ८.४.३. राष्ट्रीय एकात्मतेची गरज, ८.५ राष्ट्रीय एकात्मतेस बाधा आणणारे घटक, ८.६ राष्ट्रीय एकात्मता व विविध प्रयत्न, ८.७ शिक्षणावरील जबाबदारी, ८.८ शैक्षणिक उद्दिष्टे, ८.९ राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी शासन, शिक्षणप्रणाली, शिक्षणसंस्था व शाळा आणि शिक्षक यांची भूमिका, ८.१० राष्ट्रीय एकात्मता व शिक्षक , ८.११ भावनिक एकात्मता अर्थ व स्वरूप, ८.१२ भारतात भावनिक एकात्मतेची आवश्यकता , ८.१३ भाविनक एकात्मता व शिक्षण, ८.१४ राष्ट्रीय एकात्मता आणि भावनिक एकात्मता, ८.१५ राष्ट्रीय एकात्मता विकास आणि मानव उन्नतीमध्ये लोकशाही आंतरक्रियेचे योगदान, ८.१६ राष्ट्रीय एकात्मता विकासात सांस्कृतिक परंपरेचे योगदान, ८.१७ राष्ट्रीय एकात्मता स्थापनेतील विविध धर्मांचे योगदान, ८.१८ भारतीय सण साजरे करण्यामागील तत्त्वज्ञान

**९. शैक्षणिक नियोजन .............................. २०७-२२४**

९.१ प्रास्ताविक, ९.२ आर्थिक नियोजन, ९.३ आर्थिक नियोजन व राष्ट्र विकास, ९.४ शैक्षणिक नियोजन, ९.५ शैक्षणिक नियोजनाची गरज व महत्त्व, ९.६ शैक्षणिक नियोजनाचे तत्त्व, ९.७ नियोजनाच्या पायऱ्या, ९.८ शैक्षणिक नियोजनाची उद्दिष्टे, ९.९ शैक्षणिक नियोजनासाठी आवश्यक खबरदारी, ९.१० शैक्षणिक नियोजन व राष्ट्र विकास, ९.११ पंचवार्षिक योजना, ९.१२ पंचवार्षिक योजनांची शैक्षणिक उपलब्धी, ९.१३ शिक्षणातील सामंजस्यपूर्ण भागीदारी

१०. सामाजिक आंतरक्रिया व शिक्षण.............................२२५-२४०
१०.१ प्रास्ताविक, १०.२ व्यक्ती-व्यक्ती संबंध व व्यक्ती आणि समाज यांच्यामधील संबंध, १०.३ समाजांतर्गत समूहा समूहातील संबंध, १०.४ समाजीकरण, १०.५ समाजीकरण आणि सांस्कृतिक विकास, १०.६ समाजीकरणाचे तत्त्व, १०.७ समाजीकरणाच्या वाहिन्या, १०.८ शिक्षण आणि समाजीकरण, १०.९ वर्तमान सामाजिक व्यवस्था , १०.१० सामाजिक व्यवस्था - अर्थ:, १०.१ भारतातील नवीन सामाजिक व्यवस्था,

११. उदार व उपयुक्ततावादी शिक्षण............................ २४१-२५१
११.१ प्रास्ताविक, ११.२ पाश्चात्य देशातील उदार शिक्षण, ११.३ भारतातील उदार शिक्षण, ११.४ उदार शिक्षणाची वैशिष्ट्ये, ११.५ उपयुक्ततावादी शिक्षण, ११.६ पाश्चात्य देशातील उपयुक्तारवादी शिक्षण, ११.७ भारतातील उपयुक्ततावादी शिक्षण, ११.८ उपयुक्ततावादी शिक्षणाची वैशिष्ट्ये, ११.९ उदार शिक्षण आणि उपयुक्ततावादी शिक्षण ह्यातील एकात्मता

१२. आर्थिक विकास आणि शिक्षण............................ २५२-२७५
१२.१ प्रास्ताविक, १२.२ शिक्षण आणि अर्थशास्त्र ह्यातील संबंध,१२.३ आर्थिक विकास - अर्थ व व्याख्या, १२.४ आर्थिक विकास- स्पष्टीकरण,१२.५ शिक्षण : एक गुंतवणूक, १२.६ शैक्षणिक नियोजनाची गरज, १२.७ शैक्षणिक नियोजनासाठी मार्गदर्शक तत्त्वे, १२.८ राष्ट्रीय विकास व शैक्षणिक नियोजन, १२.९ शिक्षणाबाबतचा नवा दृष्टिकोन, १२.१० आधुनिक मूल्यांचा स्वीकार, १२.११ आर्थिक क्षेत्रातील परिवर्तनाचा शैक्षणिक अर्थ, १२.१२ नवीन आर्थिक सुधारणा व शिक्षण, १२.१३ शिक्षण व आर्थिक विकास - परस्परसंबंध, १२.१४ शिक्षण- आर्थिक विकासाचे साधन, १२.१५ शिक्षण व आर्थिक विकास - सहसंबंध

**१३. शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन........................ २७६-३०४**

१३.१ प्रास्ताविक, १३.२ सामाजिक परिवर्तन - संकल्पना, १३.३ सामाजिक परिवर्तनाच्या व्याख्या, १३.४ सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप, १३.५ सामाजिक परिवर्तनाची वैशिष्ट्ये , १३.६ सामाजिक परिवर्तन घटक, १३.७ सामाजिक परिवर्तनासाठी बाधा आणणारे घटक, १३.८ सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रिया, १३.९ शिक्षण समाजपरिवर्तनाचे साधन, १३.९.१ शिक्षणाची सामाजिक परिवर्तनामधील कार्ये, १३.९.२ शिक्षण व राष्ट्रीय उद्दिष्ट्ये, १३.९.३ शाळा सामाजिक परिवर्तनाचे केंद्र, १३.९.४ सामाजिक परिवर्तन व अभ्यासक्रम, १३.९.५ सामाजिक परिवर्तन व अध्यापनपध्दती, १३.९.६ सामाजिक परिवर्तन व शिक्षक

**१४. मानवसंसाधन विकास आणि शिक्षण................... ३०५-३१७**

१४.१ प्रास्ताविक, १४.२ मानव संसाधन विकास - व्याख्या, १४.३ मानव संसाधन विकासाचे हेतू, १४.४ मानव संसाधन विकासाचे प्रकार, १४.५ मानव संसाधन विकासाची आवश्यकता, १४.६ मानव संसाधन विकासात शिक्षणाची वैशिष्ट्ये, १४.७ मानव संसाधन विकासासाठी शिक्षण

**१५. समाजकल्याण व राष्ट्रकल्याण आणि शिक्षण........ ३१८-३२९**

१५.१ प्रास्ताविक, १५.२ समाजकल्याणासाठी शिक्षण, १५.३ समाजकल्याणासाठी शिक्षण : अर्थ आणि स्वरूप, १५.४ समाजकल्याण व शिक्षणाची उद्दिष्टे, १५.५ समाजकल्याणासाठी शिक्षण - वैशिष्ट्ये, १५.६ राष्ट्रकल्याणासाठी शिक्षण, १५.७ राष्ट्रकल्याणासाठी शिक्षण : अर्थ व स्वरूप, १५.८ राष्ट्रकल्याणासाठी शिक्षण : उद्दिष्टे, १५.९ राष्ट्रकल्याणासाठी शिक्षण - वैशिष्ट्ये, १५.१० राष्ट्रकल्याणासाठी शिक्षण, १५.११ समाजकल्याण व राष्ट्रकल्याणासाठी शिक्षणाचे दायित्व

**१६. नवसमाजरचना आणि शिक्षण............................. ३३०-३४१**

१६.१ प्रास्ताविक, १६.२ नवसमाजरचना - अर्थ व स्वरूप, १६.३ निरक्षरता निर्मूलन, १६.४ राष्ट्रीय प्रौढ शिक्षण, १६.५ राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम, १६.६ प्रौढ शिक्षणाची

व्यक्तिगत उद्दिष्टे, १६.७ प्रौढ शिक्षणाची सामाजिक उद्दिष्टे, १६.८ प्रौढ शिक्षणाची राष्ट्रीय उद्दिष्टे, १६.९ प्रौढशिक्षणासाठी कार्यान्वित केलेल्या योजना व वाहिन्या, १६.१० शिक्षणाच्या संधीची समानता, १६.११ दूर शिक्षणाची संकल्पना, १६.१२ दूर शिक्षणाचा अर्थ, १६.१३ दूर शिक्षणाची वैशिष्ट्ये, १६.१४ दूर शिक्षणाची कार्ये, १६.१५ लोकसंख्या नियोजन आणि उपलब्ध साधन यांच्या माध्यमातून दुःख, दारिद्र्यरहित सुंदर व स्वच्छ समाज निर्मिती, १६.१६ एन.सी.सी. व एन.एस.एस. यांचे शिक्षणातील योगदान

**१७. संस्कृती आणि शिक्षण............................ ३४२-३६६**

१७.१ प्रास्ताविक, १७.२ संस्कृती - व्याख्या, १७.३ संस्कृती - स्वरूप,
१७.४ संस्कृती - वैशिष्ट्ये, १७.५ संस्कृती - घटक,
१७.६ सांस्कृतिक भिन्नता निर्माण करणारे घटक, १७.७ संस्कृती - प्रकार,
१७.८ संस्कृती - तत्त्वे, १७.९ संस्कृती - कार्ये,
१७.१० संस्कृती म्हणजे सुधारणा किंवा सभ्यता नव्हे, १७.११ संस्कृती - भारतीय विचार, १७.१२ संस्कृती आणि शिक्षण यातील संबंध, १७.१३ संस्कृती व शिक्षणाची कार्ये, १७.१४ भारतीय संस्कृती आणि भारतीय शिक्षण, १७.१५ आधुनिक सांस्कृतिक बदलांचा शिक्षणावर झालेला परिणाम, १७.१६ संस्कृती - शिक्षकाची भूमिका, १७.१७ संस्कृती - काही पथ्ये/दक्षता,

**१८. आधुनिकीकरण आणि शिक्षण............................३६७-३८६**

१८.१ प्रास्ताविक, १८.२ आधुनिकीकरण : अर्थ, १८.३ आधुनिकीकरण - व्याख्या, १८.४ आधुनिकीकरण : वैशिष्ट्ये , १८.५ पारंपारिक समाज व आधुनिक समाजाचे स्वरूप, १८.६ आधुनिकीकरण आणि पाश्चात्यिकरण, १८.७ आधुनिकीकरण आणि औद्योगिकरण, १८.८ आधुनिकीकरण आणि शहरीकरण, १८.९ आधुनिकीकरण व भारतीय समाज, १८.१० आधुनिकीकरण आणि शिक्षण, १८.११ आधुनिकीकरणासंबंधी शिक्षणाची कार्ये, १८.१२ आधुनिकीकरण आणि शिक्षकाची भूमिका

**१९. उदयोन्मुख भारतीय समाज व शिक्षण..............................३८७-४०४**
१९.१ प्रास्ताविक, १९.२ उदयोन्मुख भारतीय समाजाची संकल्पना, १९.३ उदयोन्मुख भारतीय समाजाची वैशिष्ट्ये, १९.४ उदयोन्मुख भारतीय समाजाचे स्वरूप, १९.५ उदयोन्मुख भारतीय समाज आणि शिक्षण, १९.६ उदयोन्मुख भारतीय समाज आणि शिक्षक

**२०. उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक.................... ४०५-४२६**
२०.१ प्रास्ताविक, २०.२ अध्यापन व्यवसायाची संकल्पना, २०.३ अध्यापन व्यवसायाची वैशिष्ट्ये, २०.४ शिक्षकाचा सामाजिक दर्जा - कालचा व आजचा, २०.५ शिक्षकाची व्यावसायिक प्रगती, २०.६ शिक्षकाच्या व्यावसायिक समस्या, २०.७ शिक्षक संघटना, २०.८ उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक व व्यावसायिक नीतीमत्ता, २०.९ उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षकाची भूमिका,

**प्रश्नपेढी** ४२७-४२९
**प्रश्नप्रत्रिका** ४३०-४३३
**संदर्भग्रंथ सूची** ४३४-४३७

• • •

# प्रकरण १ :
# शिक्षण - संकल्पना
# (Concept of Education)

## १.१ प्रास्ताविक

शिक्षण प्रत्येक मानवी घटकाला आवश्यक असणारी एक बाब आहे. समाजात राहणाऱ्या मानवी घटकांचा शिक्षणाने वैचारिक पातळी बदलते. त्यात बदल होऊन व्यक्तिविकास होतो. व्यक्तिचा विकास सर्वच पातळीवर होणे गरजेचे आहे. व्यक्तिचा सामाजिक विकास, मानसशास्त्रीय पैलूंचा विकास, मानसिक व बौद्धिक विकास शिक्षणातून होत असतो. मानसशास्त्र शिक्षणाचा विचार व्यक्तीगत पातळीवर करते. परंतु समाजशास्त्र शिक्षणाला सामाजिक प्रक्रिया मानते. सामाजिक जीवनाशी संबंधित परस्पर आंतरक्रियांचा अभ्यास शिक्षणातून केला जावा अशी समाजशास्त्राची अपेक्षा आहे. समाजशास्त्रज्ञांच्या मते शिक्षण म्हणजे समाजिकरण. शिक्षणाच्या व्याख्या अभ्यासल्यानंतर शिक्षणाचा अर्थ आपल्याला समजू शकेल.

## १.२ व्याख्या

**सॉक्रेटिस** - "प्रत्येक माणसाच्या मनात अद्ययावत व वैश्विक विश्वासार्हता असलेल्या कल्पना बाहेर काढणे म्हणजे शिक्षण."

"Education means bringing out the ideas of universal validity which are the latest in the mind of every man" - **Saokretis**

**ऑटोवे** - "शिक्षण ही समाजातच चालणारी प्रक्रिया आहे. तिची ध्येये व तिच्या पध्दती या ज्या समाजात ती प्रक्रिया चालते त्या समाजाच्या स्वरूपावर अवलंबून असतात."

"Education is an activity which goes on in the society, and its aims and methods depend upon the nature of the soci-

ety in which it takes place"- **Ottoway**

जॉन ड्युई - "सामाजिक व्यवहार व परंपरागत उद्दिष्टांमध्ये व्यक्तीला सहभागी करून घेऊनच शिक्षणाला प्रारंभ केला पाहिजे. प्राप्त सामाजिक परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या गरजांमधूनच मुलांच्या शक्तींना खरे आवाहन मिळते व त्यातूनच त्याला खरे शिक्षण मिळते."

"All education must proceed by participation of the individual in the social activities and the purposes of the race. The only true education comes through the stimulation of the child's powers by the demands of social situations in which he finds himself"- **Dewey**

सामाजिक परिस्थितीशी जुळवून घेण्याशिवाय समाजपरिवर्तन हेही शिक्षणाचे एक प्रमुख कार्य ही कल्पना स्पष्ट करताना **ब्राऊन** म्हणतो, "व्यक्तिच्या आनुवांशिक सामाजिक जाणिवेमधील सहभागित्वातूनच सर्व प्रकारचे शिक्षण घडत असते. जेणेकरून व्यक्तीच्या वर्तनात बदल घडवून आणून तद्द्वारा एकंदर समाजामध्येही बदल घडून येईल या हेतूने जाणीवपूर्वक नियंत्रित केलेली प्रक्रिया म्हणजे शिक्षण."

"All education proceeds by participation of the individual in the social consciousness of the races. Educaiton is a consciously controlled process whereby changes in the behaviour are produced in person and through person within the group."-**Brown**

**डिक्शनरी ऑफ एज्युकेशन (संपादक गुड),** "शिक्षण म्हणजे अशा सर्व प्रक्रियांचे एकत्रीकरण ज्यायोगे व्यक्ती तिच्या क्षमता, अभिवृत्ती व ती राहात असलेल्या सामाजिक वर्तणुकीच्या घाटांचा विकास करणे; शिक्षण म्हणजे अशी सामाजिक प्रक्रिया की, जिच्याद्वारे व्यक्तींचा निवडक व नियंत्रित पर्यावरणाशी (विशेषत: शाळा) संबंध आणला जातो असे करण्याचा उद्देश व्यक्तीत सामाजिक कार्यक्षमता आणणे व तिचा

जास्तीत जास्त वैयक्तिक विकास करणे हा असतो."

"Education is the aggregate of all the processes by which a person develops ability, attitudes and forms of behaviour of practical value in the society in which he lives, the social process by which people are subjected to the influence of a selected and controlled environment (especially that of the school) so that they may obtain social competence and optimum individual development." **Dictionary of Education - Editor - Good.**

## १.३ शिक्षणाचा संकुचित व व्यापक अर्थ

शिक्षणाचे विविध संदर्भात विविध अर्थ केले जातात.

शिक्षणाचा संकुचित अर्थ : शाळांमध्ये जे शिकविले जाते ते शिक्षण

**शिक्षणाचा व्यापक अर्थ :**

(१) ज्ञान प्राप्त करणे (२) माणसाला मुक्त करणारे ते शिक्षण (३) माणसाच्या क्षमता, कौशल्ये, अभिवृत्ती, आवड इत्यादींचा इष्ट दिशेने विकास करण्यासाठी आयोजित केलेले अनुभव (४) शिक्षण म्हणजे आध्यात्मिक जीवनात प्रवेश करण्यास व सत्याचा शोध घेण्यास व मूल्यांचा वापर करण्यास मदत करण्याचे साधन होय. (५) शिक्षण म्हणजे विविध कौशल्ये आत्मसात करणे. (६) शिक्षण म्हणजे माणसाच्या मानसिक शक्तींचा विकास करणे होय. (७) शिक्षण म्हणजे समायोजन साधण्याचे कौशल्य होय.

शिक्षण एक प्रक्रिया आहे व फलित सुध्दा आहे. इष्ट, ज्ञात, आदर्श, कौशल्ये, कृती प्राप्त करण्याची प्रक्रिया व ही प्रक्रिया प्राप्त व पूर्ण झाल्यानंतरची स्थिती या दोन्ही अर्थांनी शिक्षण या शब्दाचा उपयोग केला जातो.

## १.४ शिक्षणाचे उद्देश, प्रयोजन व कार्ये

वैयक्तिक आणि सामाजिक विकासाच्या दृष्टिने शिक्षण आवश्यक घटक

आहे. जॉन ड्युईच्या मते सर्व सामाजिक संस्थांना काही अर्थ असतो, हेतू असतो. तो हेतू म्हणजे जात, लिंग, वर्ग व आर्थिक दर्जाचा विचार न करता व्यक्तित असलेल्या क्षमतांचा विकास करणे होय. शिक्षणाच्या उद्देशांचा वैयक्तिक व सामाजिक या दोन दृष्टिकोनातून विचार करता येतो. उद्देशाचे हे दोन्हीही गट परस्परविरोधी नसून एकमेकांना पूरक असतात. व्यक्तिविकासातून सामाजिक विकास होत असतो. व्यक्तीशिवाय समाजाची प्रगती शक्य नाही व समाजाशिवाय व्यक्तीच्या जीवनास काही अर्थ नाही. म्हणूनच शिक्षण हे व्यक्तिविकासातून सामाजिक विकास साधणारे असावे लागते. व्यक्तिच्या ठिकाणी सामाजिक क्षमतांचाही विकास करणे हाही शिक्षणाचा उद्देश असणे गरजेचे आहे.

शिक्षणाचे वैयक्तिक दृष्टिने व सामाजिक दृष्टिने उद्देश, प्रयोजन व कार्य अभ्यासणे क्रमप्राप्त आहे.

### १.४.१ वैयक्तिक दृष्टिने शिक्षणाचे उद्देश, प्रयोजन वा कार्य

व्यक्तिचा विकास हा शिक्षणाचा एक उद्देश आहे. त्यामुळे व्यक्तिच्या विविध क्षमतांचा, गुणांचा शक्तींचा विकास शिक्षणातून होणे महत्त्वाचे ठरते.

**१. पेस्टॉलॉजी च्या मते -** "व्यक्तीच्या आंतरिक शक्तींचा नैर्सगिक समतोल, गतिमान विकास म्हणजे शिक्षण होय."

"Education is natural, harmonious and progressive of development of mans innate powers"- **Pestolozzi**

व्यक्तीच्या आंतरिक शक्ती म्हणजे ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक शक्ती वा क्षमता होत. यांचा समतोल विकास म्हणजेच व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होय.

२. बालकाला प्रौढ जीवनासाठी तयार करणे.

३. व्यक्तींत अर्थार्जनासाठी आवश्यक त्या कौशल्यांचा विकास करणे

४. व्यक्तीच्या सामाजिक, शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक गरजा भागविणे.

५. व्यक्तीचे चारित्र्य संवर्धन करणे व समायोजन क्षमतेचा विकास करणे.

६. व्यक्तीचे जीवन सार्थक व समाधानी करण्यास मदत करणे.

७. व्यक्तीमध्ये योग्य ती वैयक्तिक, सामाजिक मूल्ये निर्माण करणे. नीतीमत्ता व्यक्तीमध्ये विकसित व्हावी म्हणून नैतिक शिक्षण देणे.

८. व्यक्तीने फुरसदीच्या वेळेचा सदुपयोग करावा यादृष्टिने फुरसदीचा वेळ कसा घालवावा याचे शिक्षण देणे.

## १.४.२ शिक्षणाचे सामाजिक उद्देश, प्रयोजन वा कार्ये

शिक्षण ही सामाजिक प्रक्रिया आहे. व्यक्ती समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. व्यक्ती सामाजिक प्रकियेत सहभागी होत असतो. समाजात चालणाऱ्या या सामाजिक आंतरक्रिया अधिकाधिक सुनियोजित व पध्दतशीर व्हाव्यात यादृष्टिने शिक्षणाचे सामाजिक उद्देश व कार्य माहिती असणे गरजेचे आहे.

ॲन्डरसन सी.ए. यांच्या मते, सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टिने शिक्षणाची पुढील कार्ये आहेत.

१. व्यक्तीला अर्थार्जनासाठी व व्यावसायिक संरचनेत भाग घेण्याच्या दृष्टिने तयार करणे. व्यक्तीला समाजाचा उत्पादक घटक बनवण्यास मदत करणे.

२. बालकाचा सामाजिक संस्कृतीशी परिचय करून देणे. त्यामुळे स्थानिक व राष्ट्रीय पातळीवर त्याचा सहभाग वाढत्या प्रमाणात होतो.

३. व्यक्तीला सृजनशीलतेचा विकास करण्यास मदत करणे. व्यक्तीमध्ये आत्मविश्वास आणि नावीन्याविषयी प्रेम निर्माण करणे.

४. स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरील जबाबदऱ्या पूर्ण करण्यासाठी उच्चभ्रू व्यक्तींची निवड करणे व त्यांच्या क्षमतांना योग्य आकार देणे. थोडक्यात, समाजाच्या सर्व क्षेत्रात नेतृत्त्व देऊ शकणाऱ्या व्यक्तींना तयार करणे.

५. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करणे. विद्यार्थ्यांना आधुनिकीकरणातील सर्व बाबींना सामोरे जाण्यासाठी, आधुनिकीकरणाचे स्वागत करण्यासाठी विद्यार्थ्यांची मानसिकता तयार करणे.

या शिवाय शिक्षणाची सामाजिक कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. समाजात होणारे सामाजिक परिवर्तन व परंपरा यांच्यात योग्य संतुलन राखण्यास मदत करणे. प्राथमिक शिक्षण, सामाजिक परंपरा राखण्यास मदत करणे तर उच्च शिक्षणाचा उपयोग समाजपरिवर्तनासाठी करता येतो.

२. बालकास समाजाचा उपयुक्त घटक बनविणे. बालकाचे सामाजिकरण व्हावे यासाठी सामाजिकीकरणाची प्रक्रिया महत्त्वाची मानून शिक्षणाद्वारे ती बालकापर्यंत पोहोचविणे.

३. राष्ट्रीय विकासासाठी सक्षम, सुजाण व कार्यक्षम व्याप्ती पुरवून मदत करणे.

४. राष्ट्रीय एकात्मता साध्य करणे व तिचा विकास करणे.

५. सामाजिक व राष्ट्रीय विकासाकरिता व्यक्तीस चांगला नागरिक होण्यासाठी मदत करणे.

६. जीवनाच्या सर्व क्षेत्रात योग्य आधुनिकीकरण आणण्यास मदत करणे.

७. राष्ट्रीय एकात्मतेतूनच आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण होते. शिक्षणातून आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करणे व त्यासाठी शिक्षणात तसे उपक्रम राबविण्याची तरतूद करणे.

८. व्यक्तिविकासातून सामाजिक विकासासाठी प्रत्येक व्यक्तीमध्ये योग्य त्या वैयक्तिक व सामाजिक मूल्यांचा विकास करणे.


वरील सर्व बाबींचा विचार केल्यास शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. व्यक्तीचे सामाजिकीकरण हेच शिक्षणाचे महत्त्वाचे उद्देश व कार्य असावे लागते. शिक्षणातून व्यक्तीचा सामाजिक विकास व राष्ट्रीय विकास करण्यावर भर दिला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मता व आंतरराष्ट्रीय सामंजस्य विकसित करण्यावर शिक्षणाने केंद्रित झाले पाहिजे. समाजशास्त्रीय आधारावर शिक्षणाची बैठक असणे आवश्यक आहे.

## १.५ उदोयन्मुख भारतीय समाजातील शिक्षणाची व्याप्ती

शिक्षण हे व्यापक व बहुव्याप्त आहे. जगातील ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात शिक्षण पोहोचले आहे. जीवनात प्रत्येक क्षणी शिक्षण आहेत. जीवनाच्या प्रत्येक बाबींशी

शिक्षणाचा संबंध येतो. समाजात जीवन जगत असताना शिक्षणाचा आधार घ्यावा लागतो. विविध विषयातून शिक्षण व्यक्तीपर्यंत पर्यायाने समाजापर्यंत पोहोचते. म्हणून शिक्षणातील समाजशास्त्र - शिक्षण - क्षेत्राशी संबंधित समाजाचे शास्त्र यात शिक्षणाची व्याप्ती समजावून घेणे गरजेचे आहे.

### शिक्षणाची व्याप्ती




● ● ●

प्रकरण - २

# समाजशास्त्राची संकल्पना

# (Concept of Sociology)

## २.१ प्रास्ताविक

शिक्षणामुळे राष्ट्रविकास होतो. राष्ट्र समाज मिळून तयार झाले आहे. शिक्षण हे समाजासाठी, समाजातील प्रत्येक घटकासाठी असते. समाजातील घटकांना कोणत्या प्रकारच्या शिक्षणाची गरज आहे याचा विचार करून शिक्षणप्रक्रिया असावी लागते. याचाच अर्थ असा की, समाजशास्त्रीय आधारावर शिक्षण असे समाजाधिष्ठित शिक्षण देणे क्रमप्राप्त ठरते. ती समाजसंकल्पना काय आहे, समाजात कोणत्या घटकांचा अभ्यास केला जातो, समाजाचा आणि शिक्षणाचा संबंध काय आहे, समाजशास्त्रीय दृष्ट्या समाजाची व्याप्ती या संकल्पनाचा अभ्यास या प्रकरणात आपण करणार आहोत.

## २.२ समाज - स्वरूप

मानव हा समूहात राहणारा प्राणी आहे. आवडी, निवडी, ध्येये, राहण्याच्या, जेवणाच्या पध्दती समान असलेले मानव एकत्रितपणे राहतात. त्यांच्या या गटाने राहण्याच्या मानवाच्या समुदायाला समाज म्हणतात. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. मानवाचे अस्तित्व माणूस समाजाशिवाय दाखवू शकत नाही, टिकवू शकत नाही. समाज ही संकल्पना मानवामानवातील सामाजिक संबंधाशी जोडलेली आहे. व्यक्ति-व्यक्तितील परस्परसंबंध समाज या संकल्पनेच्या मुळाशी आहे. समाज ही माणसाची कृती, सृजनता आहे. माणसाने समाज निर्माण केला आहे. एकाच विचाराने म्हणा, ध्येयाने म्हणा किंवा भौगोलिक क्षेत्र म्हणून म्हणा, बरेच दिवस एकत्र राहतो. एकमेकात हे व्यक्तिसमूह सदस्य इतके बांधले जातात आणि स्वत: इतर समूहातून वेगळे आहोत, त्यांचे एखादे खास वैशिष्ट्य बनवून ते एक अन् एक आहोत असे मानतात व इतरांनीही ते मान्य करावे अशी अपेक्षा करतात.

सर्वसामान्यपणे दोन किंवा अधिक व्यक्तींचा समुदाय म्हणजे समाज असे

सर्वसाधारण मानण्यात येते. मानवी समाज ही अतिशय गुंतागुंतीची व्यवस्था आहे. कारण व्यक्ती व त्यांच्या इतर सर्व आनुषंगिक आंतरक्रिया यांचा समाजात समावेश होतो. व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध हे खूपच गुंतागुंतीचे असतात. ह्या आंतरक्रियेत निर्माण होणाऱ्या संबंधावरच समाज ही संकल्पना अवलंबून असते.

## २.३ समाजाच्या व्याख्या

'समाज' या संकल्पनेच्या विविध व्याख्या आपण अभ्यासू.

**मॉरिस जिन्सबर्ग -** "नात्याने व वर्तणुकीच्या पध्दतींनी एकत्रित बांधलेल्या व्यक्तिंचा संग्रह म्हणजे समाज होय. ही नाती व वर्तणूक पध्दती या संग्रहास त्यांच्याहून वेगळी वर्तणूक असलेल्या संग्रहापासून वेगळी करतात."

**Morris Ginsberg -** "Society is a collection of individuals united by relations or modes of behaviour which ward them off from others who do not enter into those relations or who differ from them in behaviour"

**जॉन एफ. कुबेर -** "समाज हा माणसांचा समूह असतो. हा समूह बराच काळ एकत्रित राहिल्यामुळे संघटित झालेला असतो. हा समूह इतर मानवी एककांपेक्षा स्वत:स वेगळा समजत असतो व इतरांनीही वेगळे समजावे अशा अपेक्षेत असतो."

**John F. Kuber -** "A Society many be defined as a group of people who have lived together enough long to become organized and to consider them selves and be considered as a unit more or less distinct from other human units."

**मॅक आयव्हर पेज -** "सामाजिक संबंधाचे जाळे म्हणजे समाज होय. इथे सामाजिक संबंध हे व्यक्तीसमूहातील परस्परसंबंधाचे आदान प्रदान ज्या एका समूहात होते तो समाज होय."

**MacIvar Page,** "Society we shall use in a very widest sense to include every kind and degree of relationship entered into by men and any other social creatures with one another....

society when used without qualification means the whole system of social system."

वरील व्याख्यांचा विचार केल्यास समाज म्हणजे एक व्यापक संकल्पना आहे. मानवी संबंधाचा, मानवी वर्तणूक पध्दती व आंतरक्रियांचा परस्परसंबंध सतत येणारी एक व्यवस्था व एक प्रणाली आहे. सुसंघटित असा विविध उद्देशाने, भूमिकेने एकत्र येणारा विशाल समूह आहे. विशिष्ट संबंध जुळवून आंतरक्रिया करण्यास तयार असणारा मानवी समूह आहे. समान ध्येय, समान अभिरूची, समान कल्पना, समान क्षेत्र, विशिष्ट समाज जीवन पध्दती यापैकी एक किंवा अनेक गोष्टींचा स्वीकार करून दीर्घकाळ एकत्र राहणारा व्यक्तींचा समूह की जो परस्पर संबंध जपत व जगत असतो.

समाज हा गतीशील असतो. विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील मानवी संबंधावर समाजात भर दिलेला असतो. मानव हा समाजशील प्राणी आहे. संघ करून राहण्याची मानवाची प्रवृत्ती उपजत आहे. मानवाप्रमाणेच अन्य सामाजिक प्राण्यांच्या (मध्यमाशाचे पोळे, मुंग्याचे वारूळ) सामाजिकतेचे मूळ प्राण्यांच्या साहचर्यात व सहकार्यात आहे, परंतु समाज या संकल्पनेचा अर्थ केवळ एकत्र राहणे एवढ्यापुरता मर्यादित नाही. विविध मानवी घटक एकत्र येण्यात परस्परांप्रती सहकार्याची भावना निर्माण होते तेव्हा समाज या शब्दाला खरा अर्थ प्राप्त होतो. व्यक्तीच्या एकत्र येण्याने एकमेकांबद्दल प्रेम, परस्परांच्या गरजा, सहकार्यभावना, परस्पर आंतरक्रियांची - क्रिया - प्रतिक्रियांची, साद-प्रतिसादाची स्थिर व टिकून राहणारी साखळी तयार होते, तेव्हाच सामाजिक जीवनाचा आरंभ होतो.

समाज हा व्यक्ती -व्यक्तीमधील क्रिया - प्रतिक्रियांची अवस्था आहे. या सामाजिक क्रियेमधूनच व्यक्ती - व्यक्तिमधील संबंध दृढ होतात. मानव हा समाजाचा मूलभूत घटक आहे. या घटकांमधील परस्पर संबंधाची स्थिर व सुनिश्चित व्यवस्था म्हणजे समाज होय.

## २.४ समाजाची लक्षण

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, समाजाची काही लक्षणे आहेत, ती खालीलप्रमाणे -

# संदर्भग्रंथ सूची
# (Bibliography)
## मराठी


१. अहेर, हिरा (१९९५). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक. नागपूर : श्री विद्या प्रकाशन

२. आगलावे, प्रदिप (१९९९). समाजशास्त्रातील संकल्पना. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन

३. आंगले, भिकू पै. (२००३). शैक्षणिक सप्तस्तर. गोवा : लक्ष्मी प्रकाशन, मडगाव

४. उपासनी, न.के. आणि कुळकर्णी, के.वि. (१९८७). यशस्वी अध्यापन. पुणे : श्री विद्या प्रकाशन

५. उपासनी, ना.के. (२००७). अध्यापन साधना. पुणे : श्री विद्या प्रकाशन

६. करंदीकर, सुरेश आणि मंगरुळकर, मीना (२००२). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. कोल्हापूर : फडके प्रकाश्न

७. कक्कड, गुरूदेव आणि गायकवाड, शशी (१९९५). शिक्षण व अध्यापक शिक्षण. पुणे : नूतन प्रकाशन

८. कुंडले, म.बा. (१९७८). शैक्षणिक समस्यांचा इतिहास. पुणे : श्री विद्या प्रकाशन

९. कुंडले, म.बा. (२००३). अध्यापन शास्त्र आणि पध्दती. पुणे : व्हीनस प्रकाशन

१०. कुंडले, म.बा. (२००३). शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र. पुणे : श्री विद्या प्रकाशन

११. कुळकर्णी, शालिनी (२००४). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. पुणे श्री विद्या प्रकाशन

१२. कुळकर्णी विश्वभंर आणि काळदाते, सुधा (१९९४). उदयोन्मुख भारतीय समाज, संस्कृती आणि शिक्षण.
पुणे : श्री विद्या प्रकाशन

१३. गाजरे, रा.वि. आणि महंत, ज्योती, (१९८८). उदयोन्मुख भारतीय समाज, शिक्षण व शिक्षक. पुणे : नूतन प्रकाशन

१४. गावंडे, एकनाथ ना. आणि झोंबाडे, वर्षा शरद (२०००). मूल्याधिष्ठित शिक्षण प्रक्रिया आणि उपचार.
अमरावती : निर्मला प्रकाशन

१५. दुनाखे, अरविंद आणि देशपांडे, लिना, (१९९७). शिक्षणाचे समाजशास्त्र : एक रूपरेषा. पुणे : नूतन प्रकाशन

१६. दुनाखे, अरविंद (२००७). उदयोन्मुख भारतातील समाज, शिक्षण व शिक्षक. पुणे : नित्य नूतन प्रकाशन

१७. दुनाखे, अरविंद आणि देशपांडे, लिना, (२००७). प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र. पुणे : नित्य नूतन प्रकाशन

१८. पवार ना.ग. (१९९१). भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह. पुणे : नूतन प्रकाशन

१९. पवार ना.ग. (१९९८). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक. पुणे : श्री विद्या प्रकाशन

२०. पवार ना.ग. (२००४). उदयोन्मुखं भारतीय समाजातील शिक्षण. पुणे : नूतन प्रकाशन

२१. पाटील, लीला आणि कुळकर्णी, विश्वंभर (१९७४). आजचे शिक्षण : आजच्या समस्या. पुणे : श्री विद्या प्रकाशन

२२. पाटील, लीला, (१९७६). आजचे अध्यापन. पुणे : श्री विद्या प्रकाशन

२३. पारसनीस, न.रा. (१९९५). शिक्षकांचे प्रशिक्षण. पुणे : नूतन प्रकाशन

२४. पारसनीस,न.रा. (२००७). शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका. पुणे : नित्यनूतन प्रकाशन

२५. पेंडसे, प्रतिभा सुधीर, (२००६). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. नागपूर : श्री मंगेश प्रकाशन

२६. पेंडसे, प्रतिभा सुधीर, (२०१०). शिक्षणाची तात्त्विक आणि समाजशास्त्रीय भूमिका. नागपूर : श्री विद्या प्रकाशन

२७. पंडित, बन्सिबिहारी, (१९९७). शिक्षणातील संशोधन - (संकल्पनात्मक परिचय). पुणे : नूतन प्रकाशन

२८. पंडित, बन्सिबिहार आणि मोरे, लता आणि पठाण युनुस , (२००७). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक. नागपूर : पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स

२९. बापट, प्र.ग. (१९९७). भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक. औरंगाबाद : साहित्यसेवा प्रकाशन

३०. मुळावकर, संतोष आणि मुळावकर, कल्पना (२००५). मूल्यशिक्षण : सुसंवाद. नागपूर : नूतन प्रकाशन

३१. वीरकर, प्रभाकर आणि वीरकर, प्रतिभा, (१९८५). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक

- भाग २. पुणे : द्वारका प्रकाशन

३२. वीरकर, प्रभाकर आणि वीरकर, प्रतिभा, (२००४). मूल्यशिक्षण संकल्पना व कार्यवाही. पुणे : विद्यार्थी गृह प्रकाशन

३३. शिवणेकर, ल.मा. (२००९). अध्यापक भूमिका व कार्ये. पुणे : नित्य नूतन प्रकाशन

३४. सेवलेकर, उत्तम रघुनाथ (१९६६). खऱ्या शिक्षकाचा शोध. मुंबई : भारतीय ग्रंथ भवन

३५. हकीम, प्रभाकर, (२०१०). शैक्षिणिक समाजशास्त्र. पुणे : नित्य नूतन प्रकाशन

**हिंदी**

१. पवार, एन.जी. (२००३). मूल्यशिक्षा सर्वोत्तम जीवनका यशोदीप. जयपूर : बुक एन्क्लेव, शांतीनगर

२. लाल एवं पलोड, (२०११). शैक्षिक चिंतन एवं प्रयोग (उदीयमान भारतीय समाजमें शिक्षक). मेरठ : आर.लाल बुक डिपो.

**English**

1) Anand C. L. (1983). The Teacher and education in Emerging Indian Society.

2) Agrawal J. C. and Singh, A. C. (First edition) Teacher's effectiveness in India, Hugh Publication

3) Brown, Francis J. (1954) Educational Sociology.

4) Devis, Keith (1981). Human Behaviour at work: Organization Behaviour. Vol. A America: Me. Graw-Hill Inc.

5) Kamat A. R. (1985) Education and social change in India - Bombay

6) Kumar, Ashok (1997) Encyclopedia of Human Resource Management New Delhi: Anmol Publications Pvt. Ltd.

7) Lall and Palod. (2011). Educational thought and practice (Teacher in emerging society). Meerut: R. Lall Book Depot.

8) Report of all Indian education commission (1964-66)

9) Rousseau, J. J. Emile Chicago : D. C. Hearth and Co. Publishers

10) Saxena, Swaroop and Chaturvedi, Shikha. (2006). Teacher in emerging Indian society.

11) Shallygaman, Edwin R. A. Encyclopedia of social sciences Vol. 1 Editor Chief

12) Walkar, James W. (1980) Human Resource planning Vol. 16 America: Mc. Graw-Hill Inc.

● ● ●

Specimen Copy
Mangesh Prakashan, Nagpur

GOVT. COLLEGE OF EDUCATION
AKOLA- 444 001.
LIBRARY

Acc'n. No. Gift 504
Class No. ४३७
Date. 9/9/14 Price 350/-



डॉ. सौ. संध्या उद्धव सामुद्रे

सहाय्यक प्राध्यापक

डॉ. सौ. संध्या उद्धव सामुद्रे, सहाय्यक प्राध्यापक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

अध्यापन अनुभव : १९ वर्षे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ द्वारा संचलित बी.एड; एम.एड; एम.फिल. व शालेय व्यवस्थापन पदविका (डी.एस.एम.) अभ्यासक्रमाचे मान्यताप्राप्त समंत्रक, एम.एड; एम.फिल. व डी.एस.एम. च्या अनेक विद्यार्थ्यांना संशोधन मार्गदर्शन, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठीय पातळीवरील विविध विषयावर आधारित चर्चासत्र व परिषदांमध्ये सक्रिय सहभाग व शोधनिबंध सादर, विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नियतकालिकामध्ये शोधनिबंध प्रकाशित, विविध दैनिक वृत्तपत्र व नियतकालिकांमधून लेख प्रसिद्ध, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक शिक्षण संघटना परिषदेत उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार, विविध विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन, जवाहर नवोदय विद्यालय, अकोला येथे गणित विषयाकरिता आशयसंपन्नता आणि अध्यापनशास्त्र या विषयावरील राज्यस्तरीय उदबोधन वर्गास तज्ञ मार्गदर्शन, विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत संशोधन प्रकल्प, सी.टी.ई. अंतर्गत गणित कार्यशाळेचे यशस्वी आयोजन, माजी विद्यार्थी संघटना – समन्वयक, माजी विद्यार्थी संघटनेद्वारे पीएच.डी. प्राप्त माजी विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. विषय, उद्दिष्ट्ये, कार्यपद्धती, निष्कर्ष व वर्ष यावर आधारित 'गरुडझेप' या पुस्तिकेचे संपादन, एमएस–एसीआयटी आयटी फॉर टीचर्स या अभ्यासक्रमात विशेष प्राविण्य, महाराष्ट्र शासन पुरस्कृत 'जागर जाणिवांचा' या अभियानांतर्गत महिला सक्षमिकरण या कार्यशाळेचे समन्वयक व इतर उपक्रमामध्ये सहकार्य, पुस्तक लेखन : माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान, अमरावती विद्यापीठांतर्गत विभागस्तरीय बी.एड. अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळेत अभ्यासक्रम विषयक सूचना व सक्रीय सहभाग, अकोला आकाशवाणी, अकोला वर 'शब्दलोक' या कार्यक्रमात 'मर्म जीवनाचे' या विषयावर आधारित भाषण.

## पुस्तकाची वैशिष्ट्ये

१. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठाच्या बी.एड. अभ्यासक्रमावर आधारित, २. बी.एड, एम.एड. व सेट परीक्षेच्या दृष्टिने उपयुक्त, ३. अभ्यासक्रमातील बदलता दृष्टिकोन लक्षात घेऊन घटकांची मांडणी, ४. प्रत्येक प्रकरणातील मुख्य मुद्यांची व उपमुद्यांची विशिष्ट व ठळक मांडणी, ५. विषयाची सम्यक कल्पना यावी, आवश्यक ती उपयुक्त माहिती मिळावी, विचारांना चालना मिळावी, संकल्पना स्पष्ट व्हाव्यात हे पुस्तकाचे उद्देश, ६.उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण या विषयासंबंधी समाजशास्त्रीय भूमिकेबाबत संपूर्ण व विस्तृत विवेचन करणारे पुस्तक, ७. बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात आधुनिक दृष्टिकोन निर्माण करणारे पुस्तक, ८. संपूर्ण घटकावर आधारित प्रश्नपेढी.

श्री मंगेश प्रकाशन २३, नवी रामदासपेठ, नागपूर, फोन : २४३७२७६

harsulkar graphics